**Indian Streams Research Journal**
**Vol -2 , ISSUE –7, Aug.2012**
**ISSN:-2230-7850**
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# शिरूर तालुक्याची सैनिकी परंपरा

**प्रा. हरिदास शंकर जाधव**
इतिहास विभाग, चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय शिरूर.

पुणे जिल्हयातील शिरुर (घोडनदी) हा एक महत्वपूर्ण तालुका आहे. या तालुक्याच्या पश्चिमेस भिमा नदी व वेळ नदी तर पूर्वेस घोडनदी आहे. तीनही बाजूंनी नदयांनी वेढलेला हा तालुका असला तरी येथे पावसाचे प्रमाण कमी असल्याने सतत दुष्काळी परिस्थिती असते. यामुळे या तालुक्यातील लोकांनी रोजगाराचे एक साधन म्हणून सैनिकी व्यवसाय स्विकारल्याचे दिसते. मध्ययुगीन कालखंडापासून सुरु झालेली सैनिकी परंपरा आजही अखंड असलेली आपणास दिसते. मध्ययुगीन कालखंडात मुसलमानी सत्तेला प्रतिकार करणारी मराठी सत्ता उदयास आली. यामुळे या परिसरातील लोकांच्या मनस्थितीत फार मोठे परिवर्तन घडून आले. पारंपारीक शेती व्यवसाय करणाऱ्या कष्टकरी शेतकरी वर्गाने हाती शस्त्र घेऊन शिवाजी महाराजांच्या स्वराज्य निर्मितीच्या कार्यात मोठे योगदान दिले. यामध्ये या तालुक्यातील तळेगाव ढमढेरे येथील ढमढेरे सरदारांचे योगदान मोठे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे सेनापती नेताजी पालकर हे सुध्दा शिरुर तालुक्यातील तांदळी येथील होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मोगल मराठे संघर्ष मोठया प्रमाणात सुरु झाला. या संघर्षात छत्रपती संभाजी महाराजांचा जो क्रूर वध करण्यात आला ते ठिकाण वढू बुद्रुक शिरुर तालुक्यातच आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या वधानंतर संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठला. त्यात शिरुर तालुकाही मागे नव्हता. शिरुर तालुक्यातील अनेकांनी स्वराज्य रक्षणाच्या कार्यात मोलाची कामगिरी केलेली आहे. विशेषत: पेशवाईच्या काळात अनेक नविन सरदारांचा उदय या तालुक्यात झाला. त्यामध्ये तळेगावचे ढमढेरे, मलठणचे पवार, (नंतरचे कार्यक्षत्र मध्यप्रदेशातील धार येथे) जवळयाचे सोमवंशी, इनामगावचे मोकाशी यांचा समावेश होतो. त्यांनी आपल्या कर्तुत्वाने महाराष्ट्राच्या इतिहासात आपला ठसा उमटविला आहे.

ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात लष्करीदृष्टया शिरुर परिसराला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले. मुधोजी घोरपडयांनी इंग्रजांना मदत केल्यामुळे १८०२ मध्ये घोरपडयांना दोन हजार घोडेस्वारांचा रिसाला शिरुर येथे ठेवण्याची सनद मिळाली. घोरपडयांच्या या रिसाल्याने शिरुर तालुक्याला व परिसराला लष्करी दृष्टया महत्व प्राप्त झाले. नेहमीच दुष्काळाने त्रस्त असलेल्या तालुक्यातील तरुणांना रोजगाराची व पराक्रम गाजविण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली. १८१७ च्या कोरेगाव येथील लढाईत ब्रिटीशांनी शिरुर येथील लष्कराचा मोठया कुशलतेने वापर करुन घेतला. कॅप्टन स्टॉटन यांनी कोरेगाव येथील लढाईसाठी शिरुरच्या रिसाल्यातून सैनिक नेहल्याचे उल्लेख मिळतात. कर्नल बर यांच्या आदेशानुसार कॅप्टन स्टॉटन यांनी पहिल्या बॉम्बे नेटिव्ह इन्फन्ट्रीपैकी दुसरी बटालियन, दोन तोफा आणि २५० घोडेस्वार इतके सैन्य आपल्याबरोबर घेवून ३१ डिसेंबर १८१७ रोजी सकाळी ८.०० वा. शिरुरवरुन नेहल्याची नोंद मिळते.[१] या सैनिकांनी कोरेगावच्या लढाईत मोठा पराक्रम केला व ब्रिटीशांना विजय मिळवून दिला. या विजयाची निशाणी म्हणून

ब्रिटीशांनी भिमा नदीच्या काठावर विजयस्तंभ उभारलेला आहे. त्यावर **‘One of the proudest triumphs of the British Army in the East’**[२] १९१८ ला पेशवाईचा शेवट होऊन ईस्ट इंडिया कंपनीची सत्ता संपूर्ण महाराष्ट्रावर निर्माण झाली. ब्रिटीश सत्तेच्या उदयाने या परिसरात सामाजिक, आर्थिक व राजकीय बदल झाले. त्याचप्रमाणे लष्करी व्यवस्थेत व युध्दशास्त्रातही फार मोठे परिवर्तन घडून आले. मध्ययुगीन काळापासून भारतात अस्तित्वात असणारी लष्करी परंपरा पूर्णपणे बदलीली गेली. साधारणत: १८ व्या शतकापर्यंत सैन्यरचना व सैनिकीकरण हे हंगामी स्वरुपाचे होते. शासकाजवळ साधारणत: दोन प्रकारचे सैन्य असे.

१) **खडे सैन्य किंवा कायमस्वरुपी असणारे सैन्य** आणि **सरदार अथवा सरंजामदारांकडे असणारे सैन्य.**

२) **हंगामी सैन्य.**

आक्रमण करताना अथवा झालेले आक्रमण परतवून लावतांना वरील दोन्ही प्रकारच्या सैन्याचा वापर होत असे. हंगामी सैन्याची भरती युध्दकाळापुरती तात्पुरत्या स्वरुपात केली जात असे. युध्दसमाप्ती नंतर हे सैनिक आपापल्या गावी जाऊन आपला परंपरागत व्यवसाय करीत असत.

ब्रिटीश सत्तेच्या स्थापनेनंतर ब्रिटीशांनी सैन्य व्यवस्थेच्या या पध्दतीत बदल केला. सैन्य भरतीनंतर युध्दकाळ असो अथवा शांतता असो कायमस्वरुपी सैनिक म्हणून नियुक्त्या देण्यात आल्या. सैन्याचे विभाजन श्रेणीबध्द पध्दतीने ब्रिटीशांनी केले. नियमित सराव, कवायती, सैन्याच्या सुत्रबध्द व शास्त्रशुध्द हालचाली असे अभिनव प्रयोग ब्रिटीशांनी केले. विशिष्ट प्रकारचा व श्रेणीप्रमाणे बदलत जाणारा गणवेश, श्रेणीदर्शक पदके, यांची निर्मिती ब्रिटीशांनी केली. दरमहा रोख पगार व इतर सवलती दिल्याने सैन्य हा शासनाचा महत्वपूर्ण भाग किंवा घटक बनला. ज्यांना युध्दकलेची आवड आहे, अशा महत्वकांक्षी कर्तबगार तरुणांना रोजगाराची एक नविन संधी निर्माण झाली. या संधीचा फायदा शिरुर तालुक्यातील ज्यांना रोजगाराची आवश्यकता व कर्तबगारी गाजविण्याची क्षमता आहे, अश तरुणांनी घेतला. अनेक तरुण ब्रिटीश लष्करात भरती होऊ लागले. आपल्या कर्तुत्वाने रणांगणे गाजवू लागले. या सैनिकांचा उपयोग ब्रिटीशांनी भारतातील आपल्या सत्तेचा विस्तार करण्यासाठी तर केलाच परंतु जगाच्या कानाकोपऱ्यात असलेल्या आपल्या वसाहतींच्या रक्षणासाठीही केलेला दिसून येतो.

विसाव्या शतकामध्ये घडून आलेल्या दोन जागतिक महायुध्दातही या तालुक्यातील सैनिकांचा वापर अत्यंत कुशलतेने ब्रिटीशांनी करुन घेतला. शिरुर येथील विद्याधाम प्रशालेच्या प्रांगणात ब्रिटीशांनी जो विजयस्तंभ उभारला आहे त्यामध्ये **THIS TOWN MANY MENS WENT TO THE GREAT WAR – 1914-1918** अशी नोंद आहे.[३] यावरुन पहिल्या महायुध्दातील शिरुर तालुक्याचे योगदान दिसून येते.

सप्टेंबर १९३९ ला दुसरे जागतिक महायुध्द सुरु झाले. या युध्दात हिटलरच्या आक्रमणाने इंग्लड आणि दोस्त राष्ट्रे पराभवाच्या छायेत असतांना जनरल विल्सनच्या नेतृत्वाखालील भारतीय सैनिकांनी आफ्रिकेतील निबेवा हा किल्ला जिंकला. ब्रिटनचा हा दुसऱ्या महायुध्दातील पहिला विजय होता.[४] त्यानंतर लगेच हिमारेप येथे ३० हजार इटालियन सैनिकांचा पराभव भारतीय सैनिकांनी केला. सिंगापूर येथे जपानी आक्रमणाला थोपविण्याचे कार्यही भारतीय सेनेने यशस्वी केले. इराण, इराक येथील युध्द आघाडयांवरही नेत्रदिपक असे यश त्यांनी संपादन केले आहे. या महायुध्दात शिरुर तालुक्यातील १५ सैनिक मृत्युमुखी पडले.[५] याशिवाय युध्दात नेत्रदिपक यश संपादन करुन परत आलेल्याचींही संख्या मोठी आहे.

१) नानासाहेब साहेबराव भोगावडे.

२) नामदेव भुजाबा भोगावडे – सेवेचा कालावधी : २३/०२/१९४२ ते १९४७.

३) शंकर सावळेराम भोगावडे – सेवेचा कालावधी : ०८/०२/१९४१ ते २०/०९/१९५१.

४) विठठ्ल मल्हारराव मांढरे – सेवेचा कालावधी : १९४२ ते १९५०.

५) पांडुरंग मारुती धुमाळ — सेवेचा कालावधी : १९४२ ते १९४८.
६) बाबुराव शंकरराव संकपाळ — सेवेचा कालावधी १९३९ ते १९४५.[६]

यापैकी नानासाहेब भोगावडे हे तर शत्रूच्या कैदेत अनेक दिवस हाल अपेष्टा सहन करुन युध्दसमाप्ती नंतर घरी परत आले.[७] सैन्यासाठी मोर्चेबांधणी करण्याचे काम असो. बंकर तयार करणे असो, संदेश व्यवस्था करण्याचे असो अथवा दारुगोळा आणि रसद पुरविण्याचे काम असो किंवा जखमी सैनिकांना उपचारासाठी आणण्याचे काम असो अशा प्रत्येक आघाडयांवर या तालुक्यातील सैनिकांनी मोलाचे योगदान दिले आहे. अनेकांना त्यांनी बजावलेल्या मोलाच्या कार्यामुळे सन्मानदर्शक पदके मिळालेली आहेत.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. परंतु फाळणीची कटू फळे भारताला चाखावी लागली. पाकिस्तान या नविन राष्ट्राची निर्मीती झाली. पाकिस्तानच्या निर्मीतीने भारतापुढे अनेक समस्या निर्माण झाल्या. काश्मिर मिळविण्याचे प्रयत्न पाकिस्तानकडून होऊ लागले. नवनिर्मीत भारत आणि पाकिस्तान यांच्या सीमेवरची डोमेल ही चौकी २२ ऑक्टोबर १९४७ ला पाकिस्तानने काबीज केली. यातून भारत आणि पाकिस्तान यांच्यातील अंतर्गत संघर्षाला सुरुवात झाली.[८] यावेळेपर्यंत जम्मू काश्मीर संस्थान भारतात विलीन झाले नव्हते. पाकिस्तानी आक्रमणाचा धोका लक्षात घेवून २६ ऑक्टोबरला राजा हरिसिंगानी जम्मू काश्मीरच्या भारतातील विलीनीकरणाच्या करारनाम्यावर सही केली. तेव्हापासून काश्मिर हा भारताचा अविभाज्य घटक बनला.

काश्मिरच्या विलीनीकरणावर सही होईपर्यंत पाकिस्तानी फौजा श्रीनगर पर्यंत आल्या होत्या. २७ ऑक्टोबर पासून भारतीय लष्कराकडून प्रतिकाराला प्रारंभ झाला. अल्पावधीत काश्मिरवरील आक्रमण परतवून लावण्यात भारतीय लष्कराला पूर्णपणे यश आले.

१९६२ मध्ये भारत आणि चीन युध्द घडून आले तर १९६५ मध्ये भारत आणि पाकिस्तान या देशांमध्ये पुन्हा युध्द सुरु झाले. या युध्दातही पाकिस्तानचा पूर्ण पराभव भारतीय लष्कराने केला. दुस—या महायुध्दानंतर दोन देशांमध्ये युध्द होऊन, त्यातल्या एका देशाचा तुकडा पडून, नवीन राष्ट्र जन्माला येण्याचा प्रकार एकमेव झाला, तो म्हणजे बांगला देशाचा जन्म होय. ४ डिसेंबर १९७१ रोजी भारतीय लष्कराने अत्यंत सफाईने आणि निर्णायक पध्दतींने पूर्व पाकिस्तनावर हल्ला केला आणि फक्त तेरा दिवसात पाकिस्तानी लष्कराला संपूर्ण शरणागती पत्करायला लावली. युध्दशास्त्राच्या इतिहासात या अल्पावधी लढाईची 'अत्यंत महत्वाचा जय' म्हणून नोंद करावी लागली. या सर्व युध्दामध्ये शिरुर तालुक्यातील २१ सैनिकांना सन्मानदर्शक पदकांनी गौरविण्यात आले आहे.[९]

स्व. राजीव गांधी पंतप्रधान असतानाच्या काळात श्रीलंकेमध्ये अंतर्गत शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी भारतातून पाठविलेल्या शांतीसेनतही शिरुर तालुक्यातील सैनिकांचा सहभाग होता. १९९९ मध्ये घडून आलेल्या कारगील संघर्षात तर या तालुक्यातील अनेक तरुण सैनिकांनी हौतात्म्य पत्करलेले आहे. पराक्रम व शौर्य गाजवून अनेकजण परत आलेले आहेत. यामध्ये विशेषत: प्रदिप सुधाकर सरोदे.[१०] बाळासाहेब धोंडीबा गायकवाड, मेजर प्रदिप ताथवडे यांचे योगदान महत्वपुर्ण ठरते.

शिरुर तालुक्यातील भव्य सैनिकी परंपरेचा आढावा घेताना बदललेल्या युध्दपध्दतीचा व युध्दतंत्राचा विचार करणेही आवश्यक ठरते. ब्रिटीशपूर्व काळातील भारतीय युध्दपध्दती व ब्रिटीशी काळातील युध्दपध्दती यामध्ये मोठया प्रमाणात परिवर्तन झालेले दिसून येते. ब्रिटीशपूर्वकालीन युध्दपध्दती पारंपारिक म्हणजे घोडदळ व पायदळ आणि सैनिकांकडे असणारी शस्त्रास्त्रे म्हणजे — ढाल, तलवार, भाले या प्रकारची होती.

१८ व्या शतकात युरोपमध्ये औद्योगिक क्रांती घडून आल्याने युध्द शस्त्रांमध्ये प्रचंड परिवर्तन घडून आले. संहारक शस्त्राशस्त्रांचे नव नवीन शोध लागले. बंदुका व तोफा यांचा विकास झाल्याने, दळणवळणाच्या क्षेत्रात क्रांतीकारी बदल झाल्याने ब्रिटीश काळात युध्दपध्दती व शस्त्रास्त्रे

बदलली गेली. बदललेल्या शस्त्रांबरोबर युध्दशास्त्रातही बदल झाले. घोडदळाचे महत्व कमी होऊन पायदळाची मोठी वाढ झाली. हा युध्दतंत्रातील मोठा बदल होता. ब्रिटीशांच्या भारतातील आगमनाने युरोपमधील आधुनिक युध्दतंत्र भारतात आले. या नव्या युध्दतंत्राचा अवलंब आपल्या सत्ता स्थापण्यासाठी ब्रिटीशांनी भारतात केला. भारतीय समाजानेही हे नवे युध्दतंत्र आत्मसात केले.

ब्रिटीशांनी निर्माण केलेल्या सैनिकी व्यवस्थेमुळे रोजगाराची एक नवी संधी तरुणांना उपलब्ध तर झाली. पण त्याबरोबरच भारतीय समाज व्यवस्थेतील जातीयताही काही अंशी कमी होण्यास मदत झाली. सर्वधर्म समभाव ही वृत्ती सैनिकांमध्ये निर्माण झाली याबरोबरच देशभक्तीचे नवीन भान आले. मध्ययुगीन कालखंडात थोडीशी धुसर झालेली क्षात्रतेज—वृत्ती, राष्ट्राविषयीची उदासिनता नष्ट होवून देशभक्त सैनिकांची एक नवीन पिढी उदयास आली. ज्यांचा भूतकाळ रम्य असतो. त्यांचा भविष्यकाळही उज्वल असतो हे ऐतिहासिक सत्य या तालुक्यातील सैनिकांनी सिध्द केले.

**संदर्भ सूची :**


१. शिवराम महादेव परांजपे, 'मराठयांच्या लढायांचा इतिहास', प्रकाशक — शंकर नरहर जोशी, १९३४, आवृत्ती २ री.
२. कोरेगाव भिमा येथील विजयस्तंभावरील शिलालेख.
३. विद्याधाम प्रशाला शिरुर येथील विजयीस्तंभावरील शिलालेख.
४. वि.स. वाळिंबे, 'दुसरे महायुध्द', मॅजिस्टिक प्रकाशन, मुंबई—०४, प्रथमावृत्ती १९७५, पृष्ठ ११८
५. शिरुर तहसिल कचेरी येथील दुस—या महायुध्दा संदर्भातील शिलालेख.
६. दुसऱ्या महायुध्दातील हयात सैनिकांच्या मूळ सेवा पुस्तकातील नोंदी व मुलाखती.
७. कमाडिंग ऑफिसर, रॉयल बॉम्बे सॅपर्स ॲड मिनर्स GP/IE, नवी दिल्ली यांचे दि. १५ डिसें. १९४५ चे पत्र.
८. पित्रे शशिकांत मेजर ज. निवृत्त, 'डोमेल ते कारगील', राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ पुणे ३०. आ. दुसरी, मार्च—२००२ पृष्ठ ८९.
९. निवृत्त सैनिकांच्या मूळ सेवा पुस्तकातील नोंदी.
१०.ब्रिगेडियर ए.के. मिश्रा यांचा शोक संदेश दि. २ डिसेंबर १९९९.
"Certificatte of "MT accident in Operation Vijay (Rakshak) to a battle accident casualty" dt. 25th Feb. 2000.